R.No. MHAMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १०९

दि.१० एप्रिल २०२६,वार: शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## भाजपा सक्षम, मजबूत बुथची बांधणी करणार;कार्यकर्त्यांनी अपयशाचे आत्मपरीक्षण करावे भाजपाच्या प्रशिक्षण शिबिरात आ. रमेशअप्पा कराड यांचे प्रतिपादन

लातूर :- मागील काळात शासनाच्या विविध योजनेतून आणि आमदार फंडातून मोठ्या प्रमाणात निधी देऊन प्रत्येक गावागावात विकासाची कामे केली, असंख्य लाभार्थ्यांना वैयक्तिक योजनांचा लाभ दिला तरीही जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत अपेक्षित यश मिळाले नाही या अपयशाचे भाजपा पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी आत्मपरीक्षण करावे असे सांगून येत्या तीन वर्षात लातूर ग्रामीण मतदार संघातील प्रत्येक बूथ सक्षम आणि मजबूत करण्यासाठी नव्याने बांधणी केली जाणार असल्याची माहिती भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी दिली.



रेणापूर ग्रामीण मंडल भाजपाच्या वतीने बुधवारी पं. दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियाना अंतर्गत रेणापूर पिंपळफाटा येथील शामराव आकनगिरे कॉम्प्लेक्स येथे आयोजित प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिपच्या महिला बालकल्याण सभापती सौ. शिवकन्या गोडभरले, माजी सभापती अनिल भिसे, प्रशिक्षण वर्ग जिल्हा संयोजक रोहिदास वाघमारे, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, जिल्हाचिटणीस ॲड. दशरथ सरवदे, ओबीसी मोर्चाचे डॉ. बाबासाहेब घुले, पंस सदस्या सौ. अंजली काळे प्रशिक्षण वर्ग संयोजक मंडल अध्यक्ष शरद दरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षण वर्गात १५५ भाजपाच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बुथ प्रमुखांनी सहभाग घेतला.

भाजपाच्या कार्यकर्त्यांना पक्षाची शिस्त असावी, जबाबदारीचे भान असावे यासाठी प्रशिक्षण वर्ग आहे. भाजपा पक्ष जगातील सर्वात मोठा पक्ष असून पक्षा पेक्षा कोणीही मोठे नाही. असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी मेहनतीने कष्टातून रेणापूर तालुका भाजपाचा बालेकिल्ला निर्माण केला. प्रत्येक निवडणुकीत मोठे यश देणाऱ्या या तालुक्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत अपयश आले याची मोठी खंत व्यक्त करून मते का कमी मिळाली याचे प्रत्येकांनी आत्म परीक्षण करावे असे बोलून दाखवले.



अपयशातून यशाकडे जाण्यासाठी पुन्हा एकदा पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करावी लागेल. पक्षाच्या अपेक्षा पूर्ण करा, निश्चितपणे तुमच्या अपेक्षा पक्ष कधीही भंग होऊ देणार नाही. कार्यकर्त्यांना शंभर टक्के न्याय देणारा भाजपा पक्ष आहे. येत्या तीन वर्षात लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील संपूर्ण बुथ यंत्रणा मजबूत आणि सशक्त करण्यात येणार असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, या पुढील काळात बुथ प्रमुख आणि शक्तीकेंद्र प्रमुखांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाईल.

केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा समाजातील प्रत्येक वंचित गोरगरीब नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत, शासनाच्या योजनाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी पुढाकार घ्यावा भाजपाच्या माध्यमातून मंजूर झालेल्या कामाचे भूमिपूजन आणि लोकार्पण करावे अशा सूचना आ. रमेशअप्पा कराड यांनी दिल्या.

या प्रशिक्षण शिबिरात वैचारिक अधिष्ठान, भाजपाचा इतिहास, कार्यपद्धती, भाजपा सरकारची कामगिरी आणि अंमलबजावणी, सोशल मीडिया यासह विविध विषयावर भाजयुमो जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, ॲड. दशरथ सरवदे, रोहिदास वाघमारे, दिलीप पाटील, चंद्रकांत कातळे, नवनाथ मुरकुटे यांनी सत्रातील विषयानुसार आपले विचार मांडले. प्रत्येक सत्रात सत्रप्रमुख म्हणून मान्यवरांची उपस्थिती होती.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी समितीची बैठक उत्साहात संपन्न



डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीची बैठक महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात संपन्न झाली. या बैठकीला नवनियुक्त प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, प्रा.डॉ.बाळासाहेब गोडबोले, प्रा.डॉ.संजय गवई, प्रा.कल्याण कांबळे, ड.सुरेशचंद्र सलगरे, प्रा.संगमेश्वर पानगावे, गंगाधर शिनगारे आणि प्रा.प्रशांत उघाडे यांची उपस्थिती होती.

बैठकीच्या प्रारंभी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांची नियुक्ती झाल्याबद्दल समितीच्यावतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या महिन्यात महात्मा जोतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा बसवेश्वर या महापुरुषांच्या जयंत्या आहेत. तसेच वर्षभरात येणाऱ्या महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी आणि विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टिकोनातून सविस्तर चर्चा करण्यात आली. समितीचे व्यापक उद्दिष्ट समोर ठेवून महापुरुषांच्या आठवणी आणि विचारधारा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत रुजविण्याच्या अनुषंगाने समितती कार्यरत राहील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

सर्व बुद्धीजीवी बहुजन कर्मचारी यांनी समितीत सहभागी होऊन समिती बळकट करणे काळाची गरज आहे, समितीच्या माध्यमातून विविध क्रीडा स्पर्धा, अनाथ, अंध, विद्यार्थ्यांसाठी सहाय्यपुरक उपक्रम, विविध व्याख्याने, कार्यशाळा, परिसंवाद आणि चर्चासत्र आयोजीत करण्याच्या उद्देशाने सर्वांनी मनोगते व्यक्त केली.

तसेच व्यापक नियोजन करण्यासाठी पुढील बैठक शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ रोजी सायं. ०५ वा. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित करण्याचे ठरविण्यात आले.

या बैठकीचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक आणि आभार प्रा.प्रशांत उघाडे यांनी केले.

## प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी प्रत्येक घटकाला योगदान द्यावे लागेल राज्यपाल जिष्णु देव वर्मा

मुंबई: देशात दरवर्षी ३४ लाख टन प्लास्टिक कचरा तयार होत आहे. यापैकी ४० टक्के प्लास्टिक अंतिमतः नदी, नाले व भूगर्भात जात आहे. नद्या व समुद्रात प्लास्टिक गेल्यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. प्लास्टिक प्रदूषणामुळे मत्यव्यवसाय, पर्यटन व आरोग्याला धोका निर्माण होत आहे. त्यामुळे प्लास्टिकला योग्य पर्याय शोधावा लागेल आणि प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाला योगदान द्यावे लागेल, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.




संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण विभागातर्फे 'प्लास्टिक उत्पादने व प्लास्टिक पॅकेजिंग आवरणांचा पर्यावरणावरील दुष्परिणाम' या विषयावर आयोजित तज्ज्ञांच्या मुंबई येथे झालेल्या चर्चासत्राला राज्यपाल संबोधित करीत होते.

स्वच्छ पाणी व स्वच्छ पर्यावरणाशिवाय विकसित भारताचे लक्ष्य गाठता येणार नाही असे सांगून प्लास्टिक पासून पर्यावरणाला होणारा धोका लक्षात घेऊन कॉर्पोरेट, उद्योग, नीती निर्माते या सर्वांना या कार्यात पुढाकार घ्यावा लागेल व त्यासाठी विद्यार्थी, युवक व समाजाच्या इतर सर्व घटकांमध्ये जागरुकता निर्माण करावी लागेल, असे राज्यपालांनी सांगितले.

शाश्वततेशिवाय झालेल्या विकासाला 'विकास' म्हणता येणार नाही असे सांगून राज्यपालांनी प्लास्टिक प्रदूषणाच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी शासन, उद्योग जगत आणि नागरिकांना एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

तुम्ही वापरलेला पहिला टूथब्रश आजही भूगर्भात पडून आहे बाळकृष्ण पशुपती- ईश्वर सर्वव्यापी आहे, तसेच प्लास्टिकही आज सर्वव्यापी झाले असून हिमालयाच्या शिखरापासून समुद्राच्या सखोल भागापर्यंत प्लास्टिक पोहोचले आहे. तुम्ही वापरलेला पहिला टूथब्रश आज देखील जमिनीच्या पोटात कोठेतरी पडून आहे. त्यामुळे प्लास्टिक वस्तू व प्लास्टिक आवरणामुळे होणारे प्रदूषण कमी करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचे भारतातील प्रमुख बाळकृष्ण पशुपती यांनी यावेळी केले.

रिझर्व्ह बँकेची शाश्वत वित्तपुरवठ्याची योजना असून त्यामाध्यमातून पर्यावरण रक्षणाच्या कार्याला वित्त पुरवठ्याच्या माध्यमातून चालना दिली जात असल्याचे बँकेचे कार्यकारी अध्यक्ष आर. केशवन यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'वर्क इन प्रोग्रेस: रिड्युसिंग द प्लास्टिक फूटप्रिंट ऑफ प्रॉडक्ट्स अँड पॅकेजिंग' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

बैठकीला विविध कॉर्पोरेट कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य शाश्वतता अधिकारी तसेच या क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.



## संपादकीय...

# महात्मा ज्योतिबा फुले : समतेच्या क्रांतीचा अखंड दीप

भारताच्या सामाजिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही; ते पुढील अनेक पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरते. महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले हे असेच एक युगपुरुष. ११ एप्रिल हा त्यांचा जयंतीदिन केवळ स्मरणाचा सोहळा नाही; तो आपल्या समाजमनाला आरसा दाखवणारा, असमानतेच्या जखमा उघड करणारा आणि परिवर्तनाची नवी प्रेरणा देणारा दिवस आहे. ज्या काळात जातीव्यवस्था समाजजीवनाचा कणा मानली जात होती, त्या काळात फुले दाम्पत्याने त्या व्यवस्थेलाच थेट आव्हान दिले. शिक्षणावर मक्तेदारी, स्त्रियांचे दमन, शूद्र–अतिशूद्रांचे अमानवीय शोषण या सर्वांविरुद्ध त्यांनी उभा केलेला लढा हा मानवी अस्मितेचा लढा होता. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार ही जाणीव त्यांनी समाजाच्या केंद्रस्थानी आणली.

महात्मा फुले यांच्या कार्यातील सर्वात मोठा टप्पा म्हणजे शिक्षणाचा प्रसार. १८४८ मध्ये त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या काळात स्त्रीशिक्षण हा ‘पाप’ मानला जात होता. समाजाचा विरोध, अपमान, दगडफेक हे सगळे सहन करत त्यांनी शिक्षणाचा दीप विझू दिला नाही. कारण त्यांना ठाऊक होते, शिक्षण हीच खरी मुक्तीची किल्ली आहे. १८७३ मध्ये स्थापन झालेल्या ‘सत्यशोधक समाजा’ने धर्म आणि समाजव्यवस्थेच्या नावाखाली चालणाऱ्या अन्यायाला थेट प्रश्न विचारले. अंधश्रद्धा, कर्मकांड आणि जातिभेद यांना त्यांनी निर्भीडपणे आव्हान दिले. त्यांच्या विचारात धर्म म्हणजे माणसाचे कल्याण, समता आणि न्याय; म्हणूनच त्यांनी मानवतेला धर्माच्या केंद्रस्थानी ठेवले.

शेतकऱ्याचा असूड’ या ग्रंथातून त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणावर कठोर प्रहार केला. आजही शेतकरी समस्यांचा विचार केला, तर फुले यांचे विचार अत्यंत सुसंगत वाटतात. जो समाज आपल्या अन्नदात्याचा सन्मान करत नाही, तो कधीच प्रगत होऊ शकत नाही, हा त्यांचा स्पष्ट संदेश होता. स्त्रीमुक्तीच्या लढ्यातही फुले यांचे योगदान ऐतिहासिक आहे. विधवांसाठी आश्रयगृह, बालविवाहाविरुद्ध लढा, स्त्रीशिक्षणाचा प्रसार या माध्यमातून त्यांनी स्त्रीला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. सावित्रीबाईंसोबत त्यांनी उभारलेली ही चळवळ आजच्या महिला सक्षमीकरणाची पायाभरणी ठरली. आजच्या काळात आपण स्वतः ला आधुनिक म्हणतो; मात्र समाजात अजूनही जातीय भेदभाव, अंधश्रद्धा आणि असमानता दिसते. डिजिटल युगात माहिती वाढली, पण विवेक कमी झाला, अशीही स्थिती आहे. अशा वेळी फुले यांची ‘सत्यशोधक’ विचारसरणी अधिकच महत्त्वाची ठरते. फुले जयंती आपण मोठ्या उत्साहात साजरी करतो; पण त्याच वेळी त्यांच्या विचारांची अंमलबजावणी होते का, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. केवळ मिरवणुका आणि घोषणांनी समाज बदलत नाही. शिक्षणात समानता, स्त्री–पुरुष समान हक्क आणि शेतकऱ्याला सन्मान हे प्रत्यक्षात उतरले, तरच फुले यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

महात्मा ज्योतिबा फुले हे केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत; ते एक जिवंत विचार आहेत. समतेचा, न्यायाचा आणि मानवतेचा. आज गरज आहे ती फुले ‘वाचण्याची’ नाही, तर फुले ‘जगण्याची’. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि समानतेसाठी लढणे, हीच खरी फुले विचारांची परंपरा आहे. शेवटी, एक प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारावा की, आपण फुले यांचे अनुयायी आहोत की फक्त त्यांचे स्मरण करणारे? या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तरच आपल्या समाजाचा आणि देशाचा भविष्यकाळ ठरवणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

# दक्षता पथक तपासणीचे काय झाले? किती बोगस कामगार दलाल पकडले?

कामगार मंत्री महोदयाच्या खामगाव मतदार संघात काय सुरू आहे?. (ब्रेकिंग न्यूज साम टीव्ही पहा.)अर्थ संकल्पीय अधिवेशनात अनेक लोकप्रतिनिधी नी याबाबत प्रश्न विचारले होते. उत्तर मात्र गोलमाल होते.इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांच्या घरी जाऊन दलालांनी अर्ज भरून घेतले जातात.त्यासाठी रोजदारीवर आणि कमिशन वर बाई माणसं ठेवण्यात आली होती.तेच लोक भांडे वाटपाची माहिती देऊन अर्ज भरून आणतात. त्यानंतर दलालच्या सेतु कार्यालयात त्यांनीच ९० दिवसांच्या प्रमाणपत्रावर ग्रामसेवक व ठेकेदार यांच्या बनावट सही व शिक्के कॉपी पेस्टच्या आधारे तयार केली. तालुका कामगार सुविधा केंद्रावर कोणत्या दलालाच्या मार्फत अर्ज आले त्यावर काही चिन्ह टाकण्यात आली.टिक असलेले अर्ज तालुका कामगार सुविधा केंद्रांवरील कंत्राटी कर्मचारी आणि आरो यांनी प्रत्येक अर्ज मागे रक्कम ठरली ती मिळाली,तरच त्यांचीच त्यानुसार बांधकाम कामगार म्हणून बोगस नांव नोंदणी करून घेतली,आपोआप झाली नाही. त्यांनाच भांडे व पेटी वाटप झाले. कामगार संघटना कडून आलेले खऱ्या कामगारांचे अर्ज काही रक्कम मिळत नसल्यामुळे ग्रामसेवक व ठेकेदार यांच्या ९० दिवसांच्या प्रमाणपत्रावरील आवक क्रमांक दिनांक ठरलेल्या जागी नसलातर अर्ज नाकरल्या जात होते.सही व शिक्का असतांना देखील काहीना काही क्षुल्लक कारणाने नाकरल्या जातो.इंजिनियर,ठेकेदारांचे वर्क ऑर्डर,बँक डिटेल मागण्यात येते होते.खऱ्या कामगारांची त्याची सर्व कागदपत्रे बरोबर असतांना हेतुपुरस्सर अर्ज त्रुटी काढल्या गेल्या.आणि खऱ्या कामगारांची अर्ज रद्द केला गेले.मग बोगस नांव नोंदणी कोणी केली त्यावर गुन्हे दाखल झाले काय ?. दक्षता पथक तपासणीचे काय झाले ?.किती बोगस कामगार दलाल पकडले?. हे जाहीर होतांना दिसत नाही.हे कंत्राटी कर्मचारी व अधिकारी यांना वाचवण्यासाठी चालले नाटक होते.यांचे अनेक पुरावे संघटनांनी सादर केले त्यांची दखल घेतल्या गेली नाही. कामगार संघटनाची दिशाभूल करण्यासाठी हे दक्षता पथक तपासणीचे ढोंग होते हे आता सिध्द झाले आहे.

आम्ही महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समितीच्या वतीने २४/०४/२०२४ पासून सतत पत्रव्यवहार करीत आहोत.सप्टेंबर २०२४ ला आचार संहितेचा नांवाखाली पोर्टल बंद करण्यात आले होते. त्याविरोधात याचिका दाखल केली होती.तिचा निकाल ६ नोव्हेंबर २०२४ लागला होता. सरकारने त्यांची अंमलबजावणी केली नाही.पत्राचे उत्तर मिळत नाही त्यावर चर्चा होत नाही. म्हणून १२ डिसेंबर २०२४ ला आम्ही कॉम्रेड शंकर पूजारीच्या नेतृत्वाखाली मंत्रालायत धडक मारली,ईमेल,पत्राची दखल घेऊन उत्तर दिले जात नाही,चर्चा केली जात नाही,म्हणून सत्तर नोंदणीकृत कामगार संघटना पदाधिकारी यांनी प्रधान सचिव कामगार मा.विनीत सिंगल वेद मॅडम यांच्या कार्यालयत भेटीसाठी धडक दिली असता. त्यांच्या सचिवांनी पूर्व परवानगी नसल्यामुळे भेटता येणार नाही असे सांगितले.आम्ही तीन महीने झाले भेटण्याची वेळ तारीख मागतो,ईमेल देतो.त्याचे उतर मिळत नाही मग काय करायला पाहिजे.भेट घेतल्या शिवाय आम्ही जाणार नाही.बोलवा पोलिसांना अशी जोरजोरात ओरडा ओरड झाल्यामुळे विनीत सिंगल वेद मॅडम बाहेर आल्या आणि काय झाले यांची चौकशी केली आणि सर्वांना कॅबिन मध्ये घेऊन सर्व समस्या वर चर्चा केली. लवकरच समितीच्या शिष्टमंडळा बरोबर संयुक्त बैठक लावण्याचे आश्वासहन दिले होते. त्यानंतर त्यांची बदली झाली त्यांच्या जागी मा.आय ए कुंदन मॅडम आल्या त्यांना आम्ही सर्व पत्रव्यवहार करून माहिती दिली भेटण्याची वेळ तारीख मागितली.मी नवीन आहे संपूर्ण माहिती घेतो आणि बोलवतो असे तोंडी आश्वासन मिळाले.आम्ही १८ डिसेंबर २०२४ ला नागपूर हिवाळी अधिवेशनवर भव्य मोर्चा काढला.तेव्हा मंत्र्यांचे खाते वाटप झाले नव्हते. मान.अतुल सावे माजी मंत्री यांनी निवेदन स्वीकारले आणि नवीन कामगार मंत्री आले की त्यांच्या सोबत आपली मीटिंग लावून देतो असे आश्वासन दिले.

१२ डिसेंबर २०२४ ते १२ जानेवारी २०२५ एक महिना झाला. आम्ही सतत तिसऱ्या दिवशी ईमेल वर वेळ मागत होतो. शेवटी १५ जानेवारीला सतर कामगार संघटनेचे पदाधिकारी कुंदन मॅडमला भेटण्यासाठी मंत्रालयात त्यांच्या कार्यालयात भेटी साठी गेलो असतात.तेच उत्तर ईमेल मिळाला नाही,परवानगी नाही.मागच्या सारखी ओरडा ओरड नंतर पाच प्रतिनिधीना आत मध्ये घेऊन चर्चा तुम्ही कामगार संघटना वाले दलाल आहात तुम्ही कामगारांकडून पैसे गोळा असा आरोप मॅडम नी केला. कॉम्रेड शंकर पुजारी यांनी सर्व पुरावे दाखविण्याचा प्रयत्न केला असतात.त्यांनी आवाज चडवून बोलू नका असा दमच दिला,बोलू नका नाहीतर पोलिसांना बोलावून अटक करण्यास सांगेल अशी धमकी दिली. पण गेली तीस चाळीस वर्ष कामगार चळवळीचे नेतृत्व करणारी व्यक्ति वयाच्या ७५ व्या वर्षी त्याच उमदीने कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करतो.त्याचा आवाज बंद करणे शक्य नव्हते. तेव्हा कुंदन मॅडम ने पोलिसांना बोलावले ए सी पी साहेब त्यांची मंत्रालय सुरक्षा अधिकारी टीम आली त्यांनी २२ जिल्ह्यातील २२ संघटना पदाधिकारी यांना ताब्यात घेतले.शंकर पुजारी वयोवृद्ध व आजारी असल्या कारणाने त्यांना गेटच्या बाहेर सोडण्याचे सांगितले.तेव्हा मी सागर तायडे मुंबई,प्रशांत रामटेके वर्धा,प्रशांत मेश्राम अकोला,रत्नपाल डोफे यवतमाळ यांच्याशी कुंदन मॅडम यांनी संघटना आणि दलाल यांची काम करण्याची पद्धत समजून घेतली.लवकरच आपण याविषयावर संयुक्त बैठक बोलावू असे सांगितले.परंतु १५ जानेवारी २०२५ पासून आज पर्यन्त स्वतंत्र कृती समितीला चर्चा करण्यासाठी वेळ, तारीख दिली गेली नाही. पत्राचे ईमेल चे उतर मिळाले नाही.याबाबत आम्ही उप पोलिस आयुक्त मंत्रालय सुरक्षा यांना पत्र दिले आहे.

भारतीय ट्रेड युनियन ॲक्ट १९२६ च्या कायद्यानुसार नोंदणीकृत कामगार संघटना ना सोबत घेऊन काम करण्याचा हा महाराष्ट्र शासन महत्त्वाचे अति तात्काळ क्रमांक :– इबांका–२०१७/प्र.क्र.३७२/कक्ष–७, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग मादाम कामा मार्ग मंत्रालय राजगुरू चौक मंत्रालय मुंबई–४०००३२. दिनांक १५ सप्टेंबर २०१७,प्रती. कामगार आयुक्त कामगार भवन ई ब्लॉक सी –२०,बांद्रा कुर्ला संकुल बांद्रा पूर्व मुंबई ४०००२१,विषय:– बांधकाम कामगारांचे कायद्या अंतर्गत नोंदणीसाठी व लाभासाठीचे अर्ज (प्रस्ताव) नोंदणीकृत मजदूर संघटनेकडून दाखल करून घेण्याबाबत. संदर्भ :– आपल्या कार्यालयाचे क्र.मइवइबांकमं शासन संदर्भ–४/२०१७,दिनांक २९/०५/२०१७, दत्तात्रेय य.डांगे कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांच्या सहीचे आदेश यांनी पायदळी तुडवळा आहे. जन सूनवाई विधायक मंजूर होण्या अगोदर हे सरकार त्याचे प्रशासकीय अधिकारी अशा पद्धतीने न्याय देत आहेत.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना द्याव्याच्या भेटवस्तू ऐवजी रोख रक्कम देण्याबाबत महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग. शासन निर्णय क्रमांक इमारत २०१४/प्र.क्र. ८/ कामगार ७ अ, बादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक मंत्रालय मुंबई ४०००३२,तारीख २६ मे २०१४,सही– दि.सो. राजपूत सह सचिव महाराष्ट्र शासन. असा आदेश असतांना ही सुरक्षा संच,पेटी वाटप,भांडे वाटप करण्यात आले. असा आदेश असतांना कामगार मंत्र्यांना अचानक कशी काय जाग आली?. काम करता असतांना कामगारांना सुरक्षा साहित्य कंत्राटदार यांनी देणे बंधनकारक असतांना कल्याणकारी मंडळाने नाका बांधकाम कामगार यांना सुरक्षा संच वाटप का केले?.

दलालांनी दिलेल्या बोगस ९० दिवसाच्या प्रमाणपत्राची तालुका कामगार सुविधा केंद्रातील कर्मचारी यांनी चौकशी न करता अर्ज दाखल कसा करून घेतला.त्यांनीच नोंदणी अधिकारी यांची सही घेऊन मंजूरी घेतली.चौकशी न करता नोंदणी अधिकाऱ्यांनी सही करून मंजुरी कशी दिली?. हा महा भ्रष्ट युतीचा भ्रष्टाचार लपविण्यासाठी दक्षता पथक तपासणीची स्थापना करण्यात आली ३५८ तालुका कामगार सुविधा केंद्रातील तपासणी पूर्ण झाली.किती बोगस कामगार दलाल पकडले?.कंत्राटी कर्मचारी आणि अधिकारी यांच्यावर काय कारवाई झाली आहे?. हे जाहीर का होत नाही?.कामगार मंत्र्यांनी विधानसभागृहात आमदारांच्या प्रश्नाला दिलेल्या दिली त्यांची अंमलबजावणी कधी होणार?.

सरकारने व कल्याणकारी मंडळाच्या सचिवाने आपल्या बीओसीडब्लू (इजउथ) विभागातील विभाग प्रमुख व कर्मचारी आरो यांचा बचाव करण्यासाठी जे एजेंट दलाला गावोगावी निर्माण केले.त्यांचीच बीओसीडब्लू (इजउथ) विभाग प्रमुखाची दक्षता समितीवर नेमणूक केली.वास्तविक पाहता ज्या ट्रेड युनियनच्या लोकांनी पुराव्यासह आवाज उठवून सरकारच्या व मंडळाच्या सचिवांच्या लक्षात आणुन देण्याचे काम कामगार संघटनांनी केले. त्यांना सोबत घेऊन काम करणे आवश्यक होते.

एजेंट दलाल यांनी गावोगाव जाऊन ग्रामसेवक,ठेकेदार यांचा बनावट शिक्का तयार करून ९० दिवसांच्या प्रमाणपत्रावर बनावट सही व शिक्के मारून तसेच आधार कार्डावरचा एक साईट पत्ता बदलून मंडळामध्ये बोगस नाव नोंदणी करणाऱ्या फिरस्ती दलाल एजंट यांच्या साखळीत असणाऱ्या तालुका कामगार सुविधा केंद्र प्रमुख व कर्मचारी तसेच आरो यांची चौकशी दक्षता पथकाने केली पाहिजे होते,तेव्हा कुठे फिरस्ती दलाल एजंट शोधून काढता आले असते.या संदर्भात आम्ही संघटनेच्या वतीने वारंवार सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त,कामगार आयुक्त साहेब,कामगार मंत्री साहेब, कामगार प्रधान सचिव तसेच कल्याणकारी मंडळाचे सचिव यांच्याकडे पुराव्यासह एजेंट दलाल यांच्या नावा सहित तक्रारी ईमेल द्वारे आणि पत्राद्वारे केले आहेत.परंतु त्यांची अद्याप पर्यंत कोणत्याही दखल घेऊन कोणत्याही प्रकारची चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करण्यात आली नाही. मग दक्षता पथक तपासणीचे काय झाले ?.किती बोगस कामगार दलाल पकडले?.

आम्ही भारतीय संविधान मानणारे लोक आहोत म्हणून आपणास लोकशाहीच्या चौकटीत सनदशीर मार्गाने भेटण्यासाठी चर्चा करण्यासाठी वेळ व तारीख मागत आलो आहोत. त्यांची दखल घेतल्या जात नाही म्हणूनच १२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२ वाजता आझाद मैदान मुंबई येथे लक्षवेधी जन आक्रोश मोर्चा काढला.त्यात ७४ नोंदणीकृत कामगार संघटना सहभागी झाल्या होत्या.

प्रमुख मागण्या होत्या.१) बांधकाम कामगारांचे कायद्यांतर्गत नोंदणीसाठी व लाभासाठीचे अर्ज (प्रस्ताव) ट्रेड युनियन ऍक्ट नुसार नोंदणीकृत कामगार संघटने कडून दाखल करून घेण्याबाबत सोबत महाराष्ट्र शासन आदेश दिनांक १५ सप्टेंबर २०१७ ची अंमलबजावणी करण्यात यावी.मंडळावर कामगार संघटना प्रतिनिधी घेण्यात यावे.२) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गे त राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना द्यावयाच्या भेटवस्तू ऐवजी रोख रक्कम देणेबाबत महाराष्ट्र शासन आदेश दिनांक २६ मे २०१४ ची अंमलबजावणी करण्याबाबत.३) केंद्राचे इ प्रशासन धोरण लागू करण्याबाबत.४) तालुका कामगार सुविधा केंद्र महाभ्रष्टयुती आणि भ्रष्टाचारांची केंद्र झाली आहेत. त्यामुळे ती तत्काळ बंद करण्यात यावी.५) कल्याणकारी मंडळाचे सोशल ऑडिट जाहीर झाले पाहिजे.आम्ही जन आंदोलन करून शांत बसलो नाही. सनद शिर मार्गाने पत्रव्यवहार सुरू आहे. आता भाजपाच्या आमदारांच्या मतदार संघात बोगस बांधकाम कामगारांची उघड नांव नोंदणी होत आहे. त्याविरोधात संघटनांनी आवाज उचलला तर जाती संघर्ष उभा राहत आहे. अशावेळी खऱ्या कामगारांनी एकत्र येऊन संघटनेच्या पदाधिकाऱ्या सोबत उभे राहीले पाहिजे. आणि जो बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी निधीवर दिवसा ढवळ्या दरोडा टाकल्या जात आहे तो रोखला पाहिजे.

**आपला**
**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,**
**अध्यक्ष :- महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समिती**

# जिथे असेल भीमनीती, तीच खरी भीमजयंती

एप्रिल महिना आला की, गावोगावी, खेडोपाडी एकच आनंद, उत्साह असतो तो म्हणजे भीमजंयती मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्याचा. गावोगावी, खेडोपाडी, वार्डावार्डात जयंती उत्सव मंडळाची स्थापना केली जाते, भीमजंयती साजरी करण्यासाठी वर्गणीचे नियोजन केले जाते, लाखो रुपयांचा डिजे लावला जातो. वर्षातून एकदाच एकच जयंती येते म्हणून भीमजंयती च्या नावाखाली बौद्ध लोकांकडून वर्गणी गोळा केली जाते, एखाद्या व्यक्तीने वर्गणी दिली नाही तर त्याच्या बद्दल चुकीचे बोलले जाते. एकघ दिवस जयंती आहे म्हणून नाचलेच पाहिजे असा अट्टाहास हा भक्तांचा असतो. आणि लक्षात ठेवा भक्त कोणाचाही असो तो देशाला आणि समाजाला घातकच असतो. भीमजंयती निमित्ताने जागृत होणारे आणि वर्षभर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा विसर पडणारे लोक भीमजंयती साजरी करत असतील तर ती जयंती चुकीच्या मार्गांने केवळ भक्ती म्हणुनच होणार. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुयायी वर्षेभर कशाचीही अपेक्षा न ठेवता आपले काम सुरू ठेवत असतो. भीमजंयती ला नाचलेच म्हणजे जयंती साजरी केली असा अर्थ होतो का? एकच दिवस नाचुन डॉ बाबासाहेब कळणार नाहीत तर वर्षभर बाबासाहेब आंबेडकर वाचावे लागतात. जो व्यक्ती डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचतो तो व्यक्ती नाचण्याचा आग्रह कधीच करत नाही. भीम जयंती साजरी करण्यामागे एक उद्देश असला पाहिजे आणि हो उद्देश साध्य करण्यासाठी प्रत्येकाने सहकार्य केले पाहिजे. केवळ जयंती आहे म्हणून नाचगाण्यासाठी वर्गणी देतो म्हणजे खुप मोठे काम करतो असे मुळीच नाही. जयंती दिनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, त्याग आणि आपले अस्तित्व यावर विचार विनीमय होणे आवश्यक आहे. समाजातील होतकरू, गरजू आणि हुशार विद्यार्थी शिक्षण, रोजगार कसा मिळेल? तो मिळवण्यासाठी किंवा निर्माण करण्यासाठी समाजाने काय योगदान द्यायला पाहिजे? यावर चर्चा होऊन उपाय शोधने आवश्यक आहे.

थोडक्यात आपण दरवर्षी करोडो रुपये जयंती निमित्ताने निरर्थक खर्च करतो तेच पैसे आपण योग्य प्रकारे, योग्य ठिकाणी खर्च केले असते तर आज समाजात स्वतः च्या शाळा, महाविद्यालये, बँका, दवाखाने निर्माण झाले असते. स्वतःच्या शाळा, कॉलेज असते तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित शिक्षण व गुणवत्ता आम्ही देऊ शकलो असतो. आमच्या बँका किंवा इतर उद्योग असते समाजातील तरुणांना रोजगार उपलब्ध करून दैऊ शकलो असतो. दवाखाने निर्माण केले असते तर स्वस्तामध्ये एकदम चांगले उपचार सुरू गरजू लोकांना मिळाले असते. ह्या सुविधा निर्माण झाल्या असत्या तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित सुशिक्षित, जागृत विद्यार्थी तयार करू शकलो असतो. एक स्वाभीमानी नागरिक तयार करू शकलो असतो. आणि अडी अडचणीच्या काळात योग्य व अल्पदरात उपचार मिळाले असते तर समाजाची प्रगती झाली असे माणले असते. आम्ही फक्त भाषणात बोलतो बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्या साठी हे केले ते केले परंतु मुख्य प्रश्न हा आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर गेल्या नंतर आपण आपल्या साठी काय केले? डॉ बाबासाहेब यांचे नाव घेऊन स्वतः चे घरे भरण्यासाठी दुकानदारी सुरू केली. स्वाभीमानाच्या नावाखाली, राजकीय ओळख निर्माण होण्यासाठी आणि स्वतःला थोडाफार तुकडा मिळण्यासाठी प्रस्थापितांचे तळवे चाटायला लागले. अनेक वैचारिक तरुणांकडे बुद्धीमत्ता, समाजासाठी काही करण्याची धमक आहे परंतु पोटाचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना प्रस्थापितांच्या सोबत काम करावे लागते. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे त्यांचा आवाज दाबल्या जातो. जर प्रस्तापितांच्या नियंत्रणात काम करताना चळवळ व समाजासाठी काही करण्याची धमक असलेल्या तरुणांना स्वतःच्या इच्छा दाबुन ठेवाव्या लागतात. जयंती निमित्त लाखों करोडो रुपयांची उधळण करणाऱ्या समाजात चळवळीसाठी व समाजासाठी झटणाऱ्या किती तरुणांना मदत केली जाते? हा गंभीर प्रश्न आहे. चळवळीच्या व समाजाच्या नावाखाली स्वतः चे नेतृत्व निर्माण करून स्वतः चेच पोट भरणारे अनेक झाले म्हणून वामनदादा कर्डक लिहतात..

संघटना हजार झाल्या, नेते हजार झाले।

कोना म्हणावे आपुले, चेहरे हजार झाले।

तू पाहिलेली स्वप्न पूर्ण झालित का रे।

भीमा तुझ्या मतांची माणसे मेलित का रे।।

आणि आजही वामनदादांचा शब्दंशब्द खरा ठरत आहे. नेत्यांनी चळवळीची व समाजाची वाट लाऊन स्वाभिमान तर दावणीला बांधला आहेच परंतु, स्वतः ला प्रबोधनकार, गायक, लेखक, व्याख्याते समजणाऱ्या लोकांनी सुद्धां चळवळीचे वाटोळे केले. वरील लोक घसा कोरडा होईपर्यंत ओरडून ओरडून वामनदादा कर्डक यांच्याच ओळी सांगतात....

उद्धरली कोटी कुळे , भीमा तुझ्या जन्मामुळे-अगदी शंभर टक्के बरोबर आहे. भीमाच्या जन्मामुळे कोट्यवधी कुळांचा उद्धार झाला. पण प्रश्न हा आहे भीमामुळे कोट्यवधी कुळाचा उद्धार झाल्यावर, ज्यांचा ज्यांचा उद्धार झाला त्यांनी किती लोकांचा उद्धार केला? एका भीमाने कोटींचा उद्धार आणि कोटींनी मिळून एकाचाही उद्धार केला नसेल तर ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहेत असे वाटते का? बर हे ही जाऊ द्या बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ जोरजोरात ओरडून सांगणारे व्याख्याते, गायक लाखों रुपये घेतल्या शिवाय येतच नाहीत. बर हे लाखों रुपये घेतात आणी समाजासाठी एकही रुपया देतच नाहीत. ज्या वामनदादांनी आयुष्य भर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार खेडोपाडी पोहोचवले त्यांनी रुपयांची कमाई केली नाही. आणि दादांचे गाणे गाऊन लाखोंची सुपारी घेणारे आणि समाजातील गरजु घटकावर एकही रुपया खर्च न करणारे खरचं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहेत का? की फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला भांडवल बनवून स्वतः चे खिसे भरणारे पाकीट बाज कलाकार आहेत हे बघने गरजेचे आहे. लाखो रुपये घेऊनही वक्ते आणि गायक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची चुकिची मांडणी करतात. तिरस्कार, द्वेष निर्माण होईल अशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी करतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने आयोजित कार्यक्रमात अनेक गायक रक्तात भीम शोधून विचाराची हत्या करतात. तर अनेक गायक वक्ते स्टेजवर गेल्यावर बाबासाहेब यांच्या वर बोलण्या ऐवजी इतर कोणत्याही लोकांची नावे घेऊन आमचं वाटोळे केले म्हणतात, कोणत्याही संघटनेचे नाव घेऊन ही संघटना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, कार्य व संविधान विरोधी आहेत म्हणून सांगतात. लाखों रुपये घेऊनही, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्या जिवनाच सोनं केले, देशाचा उद्धार केला हे सांगण्याचे धाडस होत नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना मर्यादित आणि चुकिच्या पद्धतीने मांडण्याचे काम या लोकांनी केले. कोणती अमुक संघटना आमच्या विरोधात काम करत आहे हे सांगण्या ऐवजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या संघटनांनी एकत्र यावे हे मात्र पद्धतशीर पणे विसरतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे द्वेषाचे नाहीत तर यशाचे प्रतिक आहेत, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्धच नाही तर लोकांची बुद्धीही वाढवली, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक घरातील स्त्री घडवली, शिक्षण, हक्क अधिकार सर्वांना दिले या गोष्टी आम्ही सांगण्यात कमी पडतो. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जातीचे नाहीत तर देशाचे उद्धारक आहेत याचे च भाण बोलणाऱ्यांना नसते. जयंती ला जर लाखों रुपयांचा चुराडा होत असेल आणि त्या ठिकाणी वाचणालय नसेल, समाजातील तरुण बेरोजगार असतील, दवाखान्यासाठी कोणाकडे पैसे नसतील, आणि तरीही डिजे लावलाच जात असेल तर हे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित आहे का? डिजे, मोठ मोठे स्वतः चे बँनर समाजाच्या पैशावर लावून नेमकं काय सिद्ध करायचे असते हाच खुप गहण विषय आहे. डिजेच्या माध्यमातून वर्गणी गोळा करून जयंती साजरी करणे चुकीचेच आहे. जयंती खरचं साजरी करायची असेल आणि जयंती साजरी केल्याचा फायदा सर्वांना होऊ द्यायचा असेल तर जयंती च्या नावाखाली सध्या जेवढी वर्गणी जमा करता त्यापेक्षा जास्त जमा करावी. परंतु जमा झालेल्या पैशाचा उपयोग गावात शाळा, दवाखाना, रोजगाराची साधने उभी करण्यासाठी व्हावा. माणसाच्या शैक्षणिक, आरोग्य, रोजगार विषयक समस्या जर जयंती साजरी करण्याच्या माध्यमातून मिटत असतील तर दररोजच धुमधडाक्यात जयंती साजरी होईल. आपण हा विषय गांभीर्याने घेतला तर आपली स्वतः ची शाळा, दवाखाने, रोजगार साधने, बँका प्रत्येक तालुक्यात उभे राहतील आणि तेव्हा आमचा स्वाभिमान खऱ्या अर्थाने जागृत असेल आणि भीमजंयती साजरी झाल्याचा आनंद हा गणणात न मालणारा असेल. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने नाचने वंद केले पाहिजे आणि वाचणे सुरू केले पाहिजे तरच येणाऱ्या पिढ्या आपण वाचवू. जयंती निमित्ताने चोवीस तास वाचन, अठरा तास वाचन हा केवळ देखावा आणि भक्तांचे लक्षण आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर दररोज एकच तास वाचा परंतु नियमित वाचुन डोक्यात घ्या. तरच आपल्या भीमनीती कळेल आणि तेव्हाच भिमजयंती साजरी झाल्याचे समाधान मिळते.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# फुलेनगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

केज/प्रतिनिधी-केज शहरातील फुलेनगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आले असून शुक्रवार दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी सायं.९-०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे अनुयायी, युवकांच्या गळ्यातील ताईत, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक मा.प्रा. विठ्ठल कांगणे सर यांचे प्रबोधनपर व्याख्यान संपन्न होणार आहे तरी या कार्यक्रमास तेज शहरासह तालुक्यातील युवक-युवती व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती उत्सव कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. सध्या जयंती उत्सवाची जय्यत तयारी चालू आहे.









याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहरातील महात्मा फुले नगर,आंबेडकर नगर,हाउसिंग कॉलनी भागामध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाची धुरा प्रथमच महिलांकडे देण्यात आली आहे.

गुरुवार रोजी पासून कार्यक्रमास प्रारंभ होत आहे. प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी सर्व कार्यक्रम सकाळ आणि संध्याकाळ या दोन सत्रामध्ये घेण्यात येणार आहेत.

गुरुवार दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०-०० वाजता एल.एफ. सी.चौक फुलेनगर येथे रक्तदान शिबिर व मोफत कायरोप्रॅक्टिक महाशिबिर, दिनांक १० एप्रिल रोजी सकाळी १०-०० वाजता निबंध स्पर्धा तर सायं.७ ते ९ वाजेपर्यंत सुरसंगम प्रस्तुत भीमसुर्य उद्घाटन पर भीम गीतांची मैफल, नंतर ठीक ९-०० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे अनुयायी, लोकांच्या गळ्यातील ताईत, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक मा.प्रा. विठ्ठल कांगणे सर यांचे प्रबोधनपर व्याख्यान, दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी १०-०० वाजता सामान्य ज्ञान स्पर्धा, तर सायं.७-३० वाजता कवी,गायक, विद्रोही भिम शाहीर मेघानंद जाधव (प्रस्तुत) (परिवर्तनाचा वादळवारा) बुद्ध- भीम गीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम, दिनांक १२ एप्रिल रोजी सकाळी १०-०० वाजता वकृत्व स्पर्ध, सायं.७-३० वाजता नृत्य स्पर्धा, दिनांक १३ एप्रिल रोजी सकाळी १०-०० वाजता रांगोळी स्पर्धा, सायं.७-३० वाजता झी युवा सिंगर एक नंबर गुलामी का टूट गया जालथीम चेतन लोखंडे यांचा बहारदार भीम गीतांचा जल्लोष, रात्री ११-०० वाजता भीम ज्योत रॅली ठिकाण डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते महात्मा फुले नगर एल.एफ. सी. चौक, केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील सोनवणे यांच्या हस्ते संपन्न होणार, दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी ठीक ९-३० वाजता ध्वजारोहण व बक्षीस वितरण सोहळा, सायं. ठीक ५-०० वाजता महात्मा फुले नगर येथून भव्य मिरवणूक निघणार आहे व या मिरवणुकीमध्ये मुख्य आकर्षण हे देखावा आहे.

यावर्षी जयंती उत्सव समिती ही महिलांचे असल्यामुळे यामध्ये भिमाची वाघीण लेझीम पथक तयार करण्यात आले आहे. हे पथक गेल्या एक ते दीड महिन्यापासून तालीम दररोज नियमित करत आहेत या लेझीम पथकांमध्ये मुली व महिलांची मोठी संख्या आहे.

यावर्षीच्या जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षा नगरसेविका सौ. पद्मिनी (अक्का) गुलाबराव शिंदे, सचिव सौ. विमल बालासाहेब जोगदंड, कोषाध्यक्ष सौ. सगजानाबाई विठ्ठल गायकवाड यांच्यासह इतर महिलांची कार्यकारणी आहे.

मार्गदर्शक म्हणून अशोक गायकवाड, मनोज मस्के, तात्या गवळी, विवेक बनसोड, किरण जोगदंड, पंकज हजारे, विनोद इनकर, अशोक धीवार, ऋतिक सोनवणे, प्रेम मस्के, आदित्य मस्के हे आहेत. तर भिमाची वाघीण लेझीम पथक अध्यक्षा ऐश्वर्या वाघमारे, उपाध्यक्ष प्रियंका शिंदे, सचिव कोमल ताकतोडे, सहसचिव सारिका शिंदे यांनी या लेझीम पथकाची धुरा सांभाळली आहे.

# विद्यार्थ्यांना यशाचे शिखर गाठण्याची सुवर्ण संधी - विभागीय शिक्षण उपसंचालक मा.दीपक चवणे



लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयास लातूर विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक मा.दीपक रामराव चवणे यांनी पदावर रुजू झाल्यानंतर पहिल्यांदाच जिल्हास्तरीय आढावा बैठकीच्या निमित्ताने दि.०९ एप्रिल २०२६ रोजी भेट दिली.दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार मा.दीपक रामराव चवणे यांचा यथोचित सन्मान व सत्कार महाविद्यालयात करण्यात आला. याप्रसंगी माध्यमिक जि.प.लातूर मा.शिक्षणाधिकारी संजय क्षिरसागर, शिक्षणाधिकारी योजना (प्राथमिक विभाग, लातूर) तृप्ती अंधारे, सहाय्यक शिक्षण उपसंचालक लातूर विभागाचे संजय पंचगल्ले, डायट मुरुडचे प्राचार्य डॉ.मारुती सलगर, दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षिका डॉ.संध्या वाडीकर, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,प्रा.बळवंत सूर्यवंशी, प्रा.विजयकुमार मांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी दयानंद विज्ञान महाविद्यालयातील शिक्षण पद्धतीचा आढावा घेत असताना मा.दीपक चवणे यांनी प्रत्यक्षरित्या इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधत समाधान व्यक्त केले.तसेच विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने महाविद्यालयात शिक्षण कसे दिले जाते व कोणकोणत्या सोयी सुविधा आहेत याचेही अनुभव जाणून घेतले.यावेळी प्रत्यक्ष पाहणीनंतर ते म्हणाले की, दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालय हे शिक्षणाचे हब असून महाविद्यालयातील तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकवृंद, विद्यार्थी समस्या निर्मूलन केंद्र,नाईट रिडींगची सोय,स्मार्ट बोर्ड युक्त खोल्या, मुला-मुलींसाठीचे उत्तम वसतीगृह,डिजिटल शिक्षणावर दिलेला भर, ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षणाची सोय, जेईई,सीईटी व नीटच्या यशाची खात्री,संगणकयुक्त लॅब, संस्थेचा सुसज्ज परिसर,थेअरी व प्रॅक्टिकली शिक्षण,वेळोवेळच्या सराव परीक्षा,सर्व सोयीसुविधा येथे उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांसाठी पोषक शैक्षणिक वातावरण आहे. म्हणूनच गुणवंत विद्यार्थी घडविणाऱ्या या सर्वोत्कृष्ट दयानंद महाविद्यालयातून यशाचे शिखर गाठले पाहिजे व करिअर घडविले पाहिजे, येथे यशाचे शिखर गाठण्याची सुवर्णसंधी आहे,असे ते म्हणाले.याप्रसंगी महाविद्यालयातील इतर शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

